

# मानवतावादी चळवळ ही फुले, आंबेडकरवादाचा केंद्रबिंदू - डॉ.संदेश वाघ

महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांतून साकार झालेली लोकशाही ही अहिंसामय मार्गाचा पाठपुरावा करणारी असून त्यातून मानवतावादी चळवळ उभी राहते, असे प्रतिपादन इतिहास विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'फुले-आंबेडकरवाद क्रांतीकारी विचारप्रवाह' या एकदिवसीय राष्ट्रीय परिसंवादसमयी मुंबई विद्यापीठातील इतिहासविभागातील, विभागप्रमुख डॉ. संदेश वाघ यांनी व्यक्त केले. २० मार्च रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या वर्धापनदिनानिमित्त्य हा कार्यक्रम महाविद्यालयात दि. १५ मार्च, २०१९ रोजी पार पडला. या कार्यक्रमास रायगड जिल्ह्यातील ९ महाविद्यालयातील २५ प्राध्यांपकांनी भाग घेतला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनाजी गुरव होते.

या कार्यक्रमास मुंबई विद्यापीठातील इतिहास विभागप्रमुख डॉ.संदेश वाघ, विद्यापीठातील इतिहास विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. प्रकाश मसराम तसेच पुणे विद्यापीठाच्या अध्यासनाचे प्रमुख आंबेडकर, विचारवंत श्री. सुधाकर गायकवाड हे उपस्थित होते. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ.प्रगती पाटील यांनी केले. शैक्षणिक वर्षे २०१८-१९ मधील इतिहास विभगातील पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांचा यथोचित सत्कार मान्यवरांच्या हस्ते पार पाडला. त्यानंतर महाविद्यालयातील ए.एन.जी.सी. शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थ्यांची नांवे प्रा. युवराज जाधव यांनी घोषित करुन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. संदेश वाघ यांनी आपल्या व्याख्यानाची सुरुवात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून गोर-गरिबांच्या, अस्पृश्य समाजांच्या उन्नतीसाठी भीमकाय पराक्रम कसा साध्य केला आहे, हे मार्मिक असा काव्यातून त्यांनी प्रकट केले. आंबेडकरवादाचे पैलू त्यांनी पीपीटी स्लाईड्स सादरीकरणातून त्यांनी ते मांडले. ३५०० वर्षापासून गुलामगिरीत पिचत पडलेल्या शूद्र, अस्पृश्य समाजाच्या जगात परिवर्तन आणण्याचा मार्ग बाबासाहेबांनी सत्याग्रह, संविधानसारख्या माध्यमातून साकारला याचे डॉ. वाघ यांनी कौतुक केले परंपरागत समाज रचनेत स्त्रियांचे शोषण, धर्मांची हुकुमशाही, सवर्णलोकांची स्वार्थी वृत्ती यासारख्या जंजालातून आर्थिक दृष्ट्या दुर्बल, राजकीय तणावातील, शैक्षणिक दृष्ट्या मागास लोकांसाठी डॉ.बाबासाहेब अहोरात्र झटले. डॉ.वाघ यांनी १८८५ च्या कायद्याची माहिती सांगत रोमिला थापर, आर.एस. शर्मा सारखे इतिहासकार बांबासाहेबांसारखे समृद्ध इतिहास मांडू शकले नाहीत, याबद्दल त्यांनी खंत मांडली. आंबेडकरवाद हा लोकशाही अहिंसामय मार्गाने यशस्वी झाली पाहिजे, हे सांगत ती मानवतावादी चळवळ बनली पाहिजे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

डॉ. वाघ यांनी डॉ.बाबासाहेबांचे सामाजिक, घटनात्मक, स्त्रीवादी, राजकीय, धार्मिक, लोकशाही अशा विविध पैलूबाबत घटनात्मक आधार घेत विचार मांडले. परंपरागत धर्मग्रंथाचे प्रामाण्य नष्ट करुन त्यांचे समाजीकरण करण्याचे कार्य डॉ.बाबासाहेबांनी कसे केले याबाबत त्र्यंबक सकपाळ यांची विडंबनपर कविता त्यांनी सादर केली. यामध्ये जो परमेश्वर लेकरांची काळजी घेत नाही, त्याची सेवा कालावधी किती असे बाबासाहेब त्याला विचारतात हे त्यांनी स्पष्ट केले. शूद्रांना बंदिस्त करणारी चातुर्वण्यव्यवस्था याचे वाभाडे काढीत आंबेडकरवाद हा जातीप्रथा, अस्पृश्यताविरुद्ध आवाज उठवणारा होता हे विचार मांडले. शूद्रांनी गळ्यात मडके घालून शरीराचा घामही त्यामध्ये पडला पाहिजे ही ३५०० वर्षापूर्वीची समाजरचना डॉ.बाबासाहेबांनी बदलली त्यामुळेच समाजात मागास लोकांना गुण्यगोविंदाने जगता येते, याबद्दलही समाधान व्यक्त केले. १९८९ च्या ॲट्रासिटी कायद्याबद्दल विवेचन करीत आजही वर्तमान समाजात दर १० मिनिटांनी अस्पृश्यांवर अत्याचार होत आहे. तर २०१२ ते २०१४ पर्यंत ३०८८ दलितावर अत्याचार झाले आहेत हे गंभीर असत्याचे सांगत सर्व अस्पृश्य लोकांनी यासाठी संघटीतपणे लढा देण्याची गरज त्यांनी प्रतिपादित केली. बाबासाहेबांनी लिहिलेले संविधान हे कुठल्याही देशाची कॉपीरायटींग नसून भारतातील तळागाळातील प्रत्येक बहुजनांचा उन्नतिमार्ग त्यांनी या विधायक मार्गातून साधला असल्याचे त्यांनी सांगितले.

संविधानातील कलम १२ ते ४३ पर्यंत मानवी हक्क कसे आहेत तसेच अनुसूची ६, ७ मधील महत्त्वाच्या मुद्यांचा उहापोह डॉ. वाघ आपल्या व्याख्यानात केला. जात-पात निर्मुलन स्टेट पॉलिसीची मार्गदर्शक तत्वे, याही कायद्यामधील तरतुदींचे स्पष्टीकरण त्यांनी केले. आधुनिक स्त्रीवादाचे प्रवक्ते डॉ. बाबासाहेब असून पंडित नेहरुच्या सरकारमध्ये इतर दलितांना जागा मिळावी म्हणून आपल्या पदाचा राजीनामा देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे उदारमतवादी होते, हे दिसून येते. डॉ.बाबासाहेबांच्या मते, आधुनिक लोकशाही म्हणजे प्रत्येकाच्या डोळ्यातील अश्रू पुसणे असून त्यामधून सर्वांचे कल्याण साधले पाहिजे हे मत त्यांनी मांडले. 'मुक्ति कौन पाते' सारख्या प्रसंगातून डॉ. वाघ यांनी डॉ. बाबासाहेबांच्या मानवी संगराची कल्पना सर्वांपुढे मांडली.

परिसंवादातील दुसरे व्याख्याते डॉ. प्रकाश मसराम यांनी फुले-आंबेडकर विचारप्रवाहातील डॉ.बाबासाहेबांचे आदिवासी लोकांसाठी दिलेले योगदान स्पष्ट करीत श्री. लेड्ढा या नामवंत आदिवासी समाजातील व्यक्तिने बाबासाहेबांकडून आदर्श घेत कशाप्रकारे आदिवासी समाजाचे नेतृत्व केले, हे स्पष्ट केले. डॉ. बाबासाहेबांनी बहुजनांना संघटित व्हा. संघर्ष करा असा जो मूलमंत्र दिला आहे. त्याला स्पृश्य समाजातील लोक कशाप्रकारे नुकसान पोहचवित आहेत. याबद्दल खंत व्यक्त करीत आपण सर्व बहुजनांनी एक झाले पाहिजे असे विचार व्यक्त केले. आजही गोडं, भिल्ल समाजातील बहुजन शोषणाच्या चक्रात सापडले असून त्या सर्वांना म.फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा लढा शिकला पाहिजे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

डॉ. बाबासाहेबांचे टीकाकार बाबासाहेबांवर टीका करतात की बाबासाहेबांनी आदिवासी लोकांच्या कल्याणासाठी काहीच केले नाही. पण हे चुकीचे असून ब्रिटीश कालीन भारतात जेव्हा

१८८६ रोजी ब्रिटीशांनी मताधिकार जनतेला जाहीर केला तेव्हा या कायद्यानुसार केवळ उच्चभू समाजातील व सवर्णांनाच हक्क मताधिकार मिळाला व ज्यांची सांपतिक स्थिती नाही असा आदिवासी, वनवासी लोकांना या कायद्याबाहेर ऐकले गेले तेव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी याविरुद्ध आवाज उठवून या कायद्यामधून सांपतिक मुद्दा काढून टाकत सर्वांना हा हक्क मिळवून देण्यात डॉ. बाबासाहेबांचा वाटा महत्त्वाचा आहे. डॉ. बाबासाहेबांनी बॉम्बे प्रेसिडेन्शीमध्ये इंग्रजी सरकारला लोकशाही कशी असावी याबाबत मार्गदर्शनही केले. डॉ मसाराम यांनी बाबासाहेबांनी बनविलेल्या संविधानामधील विविध कलमांचा पॅरामिटर स्पष्ट करीत संविधानातील अनुसूची ५,६ मधील आदिवासी कल्याणाच्या योजना मांडल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. फुले यांच्या आदर्श विचारांमुळेच माझ्यासारखा एक आदिवासी घटक मुंबई विद्यापीठातील इतिहास विभागात सहाय्यक प्राध्यापक होऊ शकला, याबद्दल त्यांनी अनुज्ञेय व्यक्त केला.

परिसंवादातील तिसरे व्याख्याते व आंबेडकर फुले विचारवंत श्री. सुधाकर गाकवाड यांनी बाबासाहेबांनी लावलेलया शैक्षणिक रोपटयामुळे माझो सारखे बहुजन घडू शकले याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. महाविद्यालय, शाळा ही ज्ञान निर्मितीची केंद्रे असून केवळ बाबासाहेबांचे विचार केवळ जाणून गपप बसण्याऐवजी त्यांच्या आदर्शाचे प्रत्यक्ष कृतीत अनुकरण करणे अतयावश्यक आहे हे त्यांनी प्रतिपादित केले. अस्पृश्यांना निसर्गाने बहाल केले पाणी पिणे हा तत्कालीन समाजाने अपराध ठरवला होता म्हणूनच डॉ. बाबासाहेबांनी त्याविरूद्ध संगर उभारला. डॉ. बाबासाहेबांनी हे कृत्य का केले, यामागील मर्म प्रत्येकाने जाणले पाहिजे तरच आपणांस बाबासाहेब समजतील एखादया वस्तूकडे पाहण्याचा दृष्टीकोन महत्त्वाचा असून यासाठी डॉ. बाबासाहेबांच्या दृष्टीकोनाबाबत ते विचार समजून घेतले पाहिजेत एखादया समस्येच्या मुळाशी गेल्यासच आपणांस त्याचे उत्तर मिळते हे बाबासाहेबांनी चवदार तळयाद्वारे कसे सिद्ध केले हे गायकवाड यांनी स्पष्ट केले. 'माणूस' बाबासाहेबांचे सिद्धांत या आपल्या पुस्तकाबाबत गायकवाड यांनी चर्चा करीत समाजातील मार्तंड लोकांनी ध्र्माध लोकांनी कशाप्रकारे अस्पृश्य लोकांची गळचेपी केली हे त्यांनी स्पष्ट करीत डॉ. बाबासाहेबांनी त्यांच्यासाठी केलेले कार्य सर्वानी जाणून घेतले पाहिजे हे त्यांनी मांडले समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी आंबेडकरवादी विचारवतांनी अजूनही समाधानकारक प्रयत्न केले नाहीत वा ते प्रयत्न अपुरे आहेत याबाबत श्री. गायकवाड यांनी खंत व्यक्त करीत आजरोजी स्वातंत्र्य केवळ नावाला असून ते समता, न्याय बंधुता आणू शकत नाही यासाठीच सर्व बहुजणंनी एकत्र येऊन फुले आंबेडकरांचा क्रांतीकारी विचार प्रवाह समजून घेतला पाहिजे हे त्यांनी पोटतिडकीने मांडले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनाजी गुरव यांनी आंबेडकर फुले विचार निर्माण करण्यासाठी असे सेमिनारसारखे कार्यक्रम घेतले पाहिजेत असे आवाहन करीत समाजात जाणीव जागृती झाली पाहिजे, असे मत मांडले. फुले, आंबेडकरांचे विचार तळागाळातील सर्वांपर्यंत पोहचविण्याचे काम सर्वांनी करावे. यासाठी प्रयत्नशील राहा असे सांगत शिवाजी विद्यापीठ

कोल्हापुरात डॉ. बाबासाहेबांच्या सौंदर्यशास्त्रीय विचारांवर कार्यक्रम सुरु असून आपल्या मुंबई विद्यापीठात व महाविद्यालयातून असा कृतीमुक्त कार्यक्रम व्हावा, असा मानसही त्यांनी व्यक्त केला. केवळ पुस्तक लिहिणे एवढेच काम प्राध्यापकांनी न करता फुले, बाबासाहेबांचे विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत कसे पोहचतील यासाठी सक्रीय राहावे, असे आवाहनही त्यांनी सेमिनारमधील सर्व प्राध्यापक वर्गास केले. सुधारणा स्वत:पुरताच मर्यादित न ठेवता सर्वांसाठी ती व्यापक स्वरुपाने करावी. केवळ भाषण करण्यापेक्षा कृतीयुक्त कार्यक्रम होणे गरजेचे आहेत. हे मतही त्यांनी मांडले. यासाठी प्रत्येकाने प्रचंड वाचन करावे. डॉ.बाबासाहेब तसेच म.फुल्यांनी सांगितल्याप्रमाणे समस्येच्या मुळाशी जावून त्याचा अर्थ समजून घ्यावा, म्हणजेच क्रांतीकारक पर्व येईल, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटच्या पर्वात सहभागी महाविद्यालयीन प्राध्यापकांना उपस्थितीबाबत प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन डॉ. प्रगती पाटील यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.